# ॥ श्रीमद्भगवद्गीता शुद्ध उच्चारण मार्गदर्शिका - स्तर 4 ॥

## माहेश्वर सूत्र

1. अइउण्।
2. ऋऌक्।
3. एओङ्।
4. ऐऔच्।
5. हयवरट्।
6. लण्।
7. ञमङणनम्।
8. झभञ्।
9. घढधष्।
10. जबगडदश्।
11. खफछठथचटतव्।
12. कपय्।
13. शषसर्।
14. हल्।

**'प्रत्याहार' –** शब्दां च्या निरुपणा साठी किंवा नियम तयार करण्यासाठी जेव्हा काही विशेष वर्ण समूहांच्या प्रयोगाची आवश्यकता असते, तेव्हा त्या वर्णांचा माहेश्वर सूत्रां पासून प्रत्याहार बनवून संक्षिप्त स्वरूपात स्वीकार केल्या जातो. प्रत्याहार चा अर्थ – संक्षिप्त कथन. आद्य वर्ण आणि अन्तिम वर्ण मिळून प्रत्याहार तयार होतो.

**उदा.** = **'अच्'** प्रत्याहार - प्रथम माहेश्वर सूत्र **'अइउण्'** मधील आद्य वर्ण 'अ' ला चतुर्थ सूत्र **'ऐऔच्'** मधील अन्तिम वर्ण 'च्' सोबत जोडल्याने **'अच्'** प्रत्याहार बनतो. म्हणून **'अच्'** प्रत्याहार म्हणजे 'अ, इ, उ, ऋ, ऌ, ए, ऐ, ओ, औ' या वर्णांचा समूह.

## सन्धि-नियम

दोन वर्ण एकत्र आल्यावर सन्धि होते. एकत्र येणारे वर्ण स्वर असल्यास त्या सन्धिला स्वरसन्धि, व्यञ्जन असल्यास व्यञ्जन सन्धि, अनुस्वार असल्यास अनुस्वार सन्धि आणि विसर्ग असल्यास विसर्गसन्धि म्हणतात. सन्धि झाल्यावर एकत्र येणाऱ्या वर्णांमधील कुठल्याही एका वर्णामध्ये, किंवा कधी दोन्ही वर्णांमध्ये परिवर्तन होते.

### व्यञ्जन वा हल् सन्धि –

एक व्यञ्जन दुसऱ्या व्यञ्जनाशी युक्त झाल्यावर जे परिवर्तन होते त्याला व्यञ्जन सन्धि असे म्हणतात. व्यञ्जन सन्धि ला संस्कृत मध्ये हल् सन्धि असेही म्हणतात. व्यञ्जन सन्धि चे अनेक प्रकार आहेत –

## १. श्चुत्व सन्धि –

- **स्तो: श्चुना श्चु: -** सकार, तवर्ग यांची शकार, चवर्गा सोबत सन्धि झाल्यावर, सकार, तवर्ग च्या स्थानी क्रमशः परिवर्तन होऊन शकार, चवर्ग होतो. अशा प्रकारे झालेल्या सन्धितील सकार, तवर्ग आणि शकार, चवर्ग यांतील वर्णांचा क्रम मागे पुढे होऊ शकतो परंतु परिवर्तन केवळ सकार आणि तवर्गाच्याच स्थानी होईल.

  उदा. – मनस्+चञ्चलम्= मनश्चञ्चलम् (6/26), युन्+जीत=युञ्जीत (6/10), यद्+ज्ञात्वा=यज्ज्ञात्वा (4/16)

| एकत्र येणारे दोन व्यञ्जन | | स् आणि तवर्ग चे परवर्तित रूप |
|---|---|---|
| स् | श्, च्, छ्, ज्, झ्, ञ् | श् |
| त् | | च् |
| थ् | | छ् |
| द् | | ज् |
| ध् | | झ् |
| न् | | ञ् |

(टीप - क्ष = क् + ष, त्र = त् + र, ज्ञ = ज् + ञ असल्याने यांसाठी क्रमशः क्, त् आणि ज् शी सम्बन्धित नियमच लागू होतात.)

## २. ष्टुत्व सन्धि –

- **ष्टुना ष्टु: -** सकार किंवा तवर्गा ची षकार अथवा टवर्गा सोबत सन्धि झाल्यावर सकार आणि तवर्गा च्या स्थानी क्रमशः परिवर्तन होऊन षकार आणि टवर्ग होतो. सन्धि मध्ये सकार, तवर्ग आणि षकार, टवर्गातील वर्णांचा क्रम मागे पुढे होऊ शकतो परंतु परिवर्तन केवळ सकार आणि तवर्गाच्याच स्थानी होईल.

  उदा. - दृष् + तः = दृष्टः (2/16), सृष्+त्वा= सृष्ट्वा (3/10), प्रनष्+त:=प्रनष्ट: (18/72)

| एकत्र येणारे दोन व्यञ्जन | | परवर्तित रूप |
|---|---|---|
| स् | ष्, ट्, ठ्, ड्, ढ्, ण् | ष् |
| त् | | ट् |
| थ् | | ठ् |
| द् | | ड् |
| ध् | | ढ् |
| न् | | ण् |

## ३. चर्त्व सन्धि –

- **खरि च –** वर्गीय व्यञ्जनातील प्रथम, द्वितीय वर्ण किंवा श, ष, स (खर्/कठोर व्यञ्जन) उत्तर पदांत असतील तर वर्गातील प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ण तसेच श, ष, स, ह (झल्) यांचे परिवर्तन क, च, ट, त, प, श, ष, स ('चर्') मध्ये होते.

  उदा. - हृद् + स्थम् = हृत्स्थम् (4/42), तद्+कुरुष्व = तत्कुरुष्व(9/27), छिद्+त्वा=छित्त्वा(4/42)

- **वाऽवसाने –** अवसानात (अवसान = पदान्त) वर्गीय व्यञ्जनातील प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ण तसेच श, ष, स, ह (झल्) असल्यास विकल्पाने क, च, ट, त, प, श, ष, स (चर्) मध्ये परिवर्तीत होतात.

  उदा. - सुहृद् = सुहृत् (9/18), वाग्=वाक्, उपनिषद्=उपनिषत्, भगवद्=भगवत्

## ४. जश्त्व सन्धि –

- **झलां जश् झशि –** पांचही वर्गातील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्ण मृदुव्यञ्जन अथवा स्वराच्या पूर्वी असल्यास त्यांचे, त्यांच्याच वर्गातील तृतीय वर्णा (ग्, ज्, ड्, द्, ब्) मध्ये परिवर्तन होते.

  उदा.- लभ्+ध्वा = लब्+ध्वा = लब्ध्वा (4/39), बोध्+धव्यम्=बोद्+धव्यम्= बोद्धव्यम्(4/17), युध् + ध = युद्ध (2/37)

## ५. धत्व सन्धि –

- **झषस्तथोर्धोऽधः –** वर्गीय व्यञ्जनातील चतुर्थ वर्णाच्या पुढे जर त् अथवा थ् असेल तर त्याचे धकारा मध्ये परिवर्तन होते. (या सन्धि च्या पश्चात् जश्त्व सन्धि होत असल्यास पूर्ववर्ण त्याच्या तृतीय वर्णांत परिवर्तित होतो)

| पूर्ववर्ण | उत्तरवर्ण | परिवर्तित रूप |
|---|---|---|
| घ् | त्/थ् | ग्ध् |
| झ् | | ज्ध् |
| ढ | | ड्ध् |
| ध् | | द्ध |
| भ् | | ब्भ् |

उदा. - बोध् + तव्यम् = बोद् + धव्यम् = बोद्धव्यम् (4/17), रुध्+त्वा= रुद्+ध्वा=रुद्ध्वा(4/29)

## ६. षत्व सन्धि –

- **व्रश्चभ्रस्जसृजमृजयजराजभ्राजच्छशां षः -** व्रश्च इत्यादि सप्त धातुंच्या आणि छकारान्त तसेच शकारान्त धातुंच्या अन्तिम वर्णाच्या स्थानी 'षकार' आदेश होतो, पदान्तात असल्यास अथवा 'झल्' पुढे असल्यास.

  उदा.- दृश् धातु पासून दृष् आणि दृष्टि यांच सूत्रानुसार होते.
- **आदेशप्रत्यययोः -** जर पूर्व आदेशामुळे 'स्' झाला असल्यास अथवा प्रत्ययांत 'स्' असल्यास, अथवा त्याच्या आधी 'इण्' (इ, उ) किंवा 'कवर्ग' असल्यास 'सकारा' चा 'षकार' होतो.

  उदा. - भोक् + स्यसे = भोक् + ष्यसे = भोक्ष्यसे (2/37), हनि+स्ये=हनि+ष्ये=हनिष्ये(16/14)

## ७. कत्व सन्धि –

- **षढोः कः सि –** 'ष' आणि 'ढ' चा 'क' होतो 'स' पुढे असल्यास.

  उदा. – विनंष् + ष्यसि = विनंक् + ष्यसि = विनङ्क् + ष्यसि = विनङ्क्ष्यसि (18/58)

## ८. कुत्व सन्धि –

- **चोः कुः** - पदान्तात विद्यमान चवर्गाचा कुठलाही वर्ण, त्याच्या पुढे अन्तःस्थ आणि अनुनासिक सोडून कुठलाही वर्ण असल्यास अथवा काहीही नसल्यास क्रमशः क वर्गांत परिवर्तित होतो.

| पूर्ववर्ण | उत्तरवर्ण | परिवर्तित रूप |
|---|---|---|
| च् | प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ण, श, ष, स, ह, अवसान | क् |
| छ् | | ख् |
| ज् | | ग् |
| झ् | | घ् |

उदा. - मुच् + तः = मुक्तः (5/28)

## ९. तुगागम सन्धि –

- **छे च -** ऱ्हस्व स्वरा नंतर 'छ' असल्यास छकारा पूर्वी 'त्' चे आगमन होते व तत्पश्चात् श्चुत्व सन्धिने चकारात परिवर्तन होते.

  उदा. - कृष्ण + छेत्तुम् = कृष्ण +त्+ छेत्तुम् = कृष्ण +च्+ छेत्तुम् = कृष्णच्छेत्तुम् (6/39)

- **पदान्ताद्वा –** पदान्तातील दीर्घ स्वरानंतर 'छ' असताना सुद्धा 'त्' चे आगमन विकल्पाने होते.

  उदा. - गायत्री + छन्दसाम् = गायत्रीच्छन्दसाम् अथवा गायत्री छन्दसाम् (10/35)

## १०. ङमुडागम सन्धि –

- **ङमो ऱ्हस्वादचि ङमुण्नित्यम् –** कुठल्याही ऱ्हस्व वर्णानंतर ङ्, ण्, अथवा न् असल्यास आणि त्याच्या पश्चात् कुठलाही स्वर असल्यास ङ्, ण्, न् चे क्रमशः द्वित्व होते.

  उदा. - कुर्वन् + अपि = कुर्वन्नपि (5/7), सन् + अव्ययात्मा= सन्नव्ययात्मा(4/6), प्रहसन् + इव=प्रहसन्निव(2/10)

## ११. रुत्व सन्धि

- **नश्छव्यप्रशान् –** पदान्तातील 'नकारा' नंतर च्, छ्, ट्, ठ्, त् अथवा थ् हे वर्ण येत असल्यास आणि त्या नंतर कुठलाही स्वर अथवा ह्, य्, व्, र्, ल्, ङ्, ञ्, ण्, न् असल्यास नकार स्, श्, ष् मध्ये परिवर्तित होतो आणि त्याच्या पूर्ववर्णावर अनुस्वार दिल्या जातो.

  (नकार + त्, थ् = सकार, नकार + च्, छ् = शकार, नकार + ट्, ठ् = षकार)

  उदा. - विद्वान् + तथा = विद्वांस् + तथा = विद्वांस्तथा (3/25), गतासून् + च = गतासूंश्च (2/11), प्रज्ञावादान् + च = प्रज्ञावादांश्च (2/11)

## १२. अनुस्वार सन्धि

- **मोऽनुस्वारः –** पदान्तातील 'मकारा' चा अनुस्वार होतो, जर त्या नंतर एखादे व्यञ्जन येत असेल तर.

  उदा. – हर्षम् + कुरुवृद्धः = हर्षं कुरुवृद्धः (1/12), शङ्खम् + दध्मौ = शङ्खं दध्मौ(1/12)

- **नश्चापदान्तस्य झलि –** अपदान्त 'नकार' आणि 'मकार' यांचे अनुस्वारांत परिवर्तन होते, वर्गीय व्यञ्जनातील प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ण तसेच श, ष, स, ह ('झल') पुढे असल्यास.

  उदा. - वासान् + सि = वासांसि (2/22)

## १३. अनुनासिक सन्धि

- **यरोऽनुनासिकेऽनुनासिको वा –** पांचहि वर्गातील पहिल्या चार व्यञ्जनां पैकी कुठलेही व्यञ्जन जर पदान्तात असेल आणि त्याच्या पुढे कुठलेही अनुनासिक व्यञ्जन येत असेल तर ते व्यञ्जन त्याच्याच वर्गातील अनुनासिक व्यञ्जनात परिवर्तित होते.

  उदा. – वाक् + मनोभिर्यत् = वाङ्मनोभिर्यत् (18/15), षट् + मासाः = षण्मासा (8/24), जगत् + निवास = जगन्निवास (11/37)

| पूर्ववर्ण | उत्तरवर्ण | पूर्व वर्णाचे परिवर्तित रूप |
|---|---|---|
| क वर्ग | ङ्, ञ्, ण्, न्, म् | ङ् |
| च वर्ग | | ञ् |
| ट वर्ग | | ण् |
| त वर्ग | | न् |
| प वर्ग | | म् |

## १४. परससवर्ण सन्धि

- **अनुस्वारस्य ययि परसवर्णः -** अनुस्वाराच्या पुढे जर कुठल्याही वर्गा चे कुठलेही व्यञ्जन येत असेल तर त्या अनुस्वाराचे त्याच्या पुढे येणाऱ्या व्यञ्जन वर्गातील अनुनासिक वर्णांत परिवर्तन होते.

  उदा. – सं + मूढः = सम्मूढः (५/२०), युं + जन् = युञ्जन् (६/२८)

- **वा पदान्तस्य –** उपरोक्त निर्दिष्ट नियम पदान्त-अनुस्वारा च्या बाबतीत वैकल्पिक आहे अर्थात् पदान्तातील अनुस्वाराचे अनुनासिक वर्णामध्ये परिवर्तन वैकल्पिक आहे.

  उदा. = मां + पश्यति = मां पश्यति/माम्पश्यति (३/३०)

- **तोर्लि –** 'तवर्गा' च्या पुढे 'लकार' आल्यांस परसवर्ण होतो.

  उदा. - श्रुतिमत् + लोके = श्रुतिमल्लोके (13/13), श्रद्धावान् + लभते = श्रद्धावाँल्लभते (4/39)

## १५. पूर्वसवर्ण सन्धि

- **झयो होऽन्यतरस्याम् –** पाचहि वर्गातील प्रथम चार व्यञ्जनांच्या पुढे जर हकार येत असेल तर तो हकार, पूर्वव्यञ्जनाच्या वर्गातील चतुर्थ व्यञ्जनांत परिवर्तित होतो. हा नियम वैकल्पिक आहे.

| प्रथम वर्ण | द्वितीय वर्ण | द्वितीय वर्ण के स्थान पर परिवर्तन |
|---|---|---|
| क वर्ग | ह् | घ् |
| च वर्ग | | झ् |
| ट वर्ग | | ढ् |
| त वर्ग | | ध् |
| प वर्ग | | भ् |

  उदा. - एतद् + हि = एतद्धि (6/42)

- **शश्छोटी –** पाचहि वर्गातील प्रथम चार व्यञ्जनां पैकी कुठल्याही व्यञ्जनानंतर जर शकार येत असेल आणि त्या नंतर कुठलाही स्वर अथवा ह्, य्, व्, र् हे वर्ण आले तर शकार, छकारांत परिवर्तित होतो. हा नियम वैकल्पिक आहे.

  उदा. - एतच् + श्रुत्वा = एतच्छ्रुत्वा (11/35), तस्मात् + शास्त्रम् = तस्माच्छास्त्रम् (१६/२४)

## ॥ द्वित्व(आघात) नियम॥

द्वित्वादि उच्चारणांचे जे नियम भगवद्गीतेच्या उच्चारणांना अधिक उत्तम तसेच सरळ बनवण्याच्या उद्देशाने स्वीकार केल्या गेले आहेत ते खाली देत आहे -

### मूल द्वित्व नियम - अनचि च, स्वरात् संयोगादिर्द्विरुच्यते सर्वत्र।

स्वराच्या पुढे संयुक्त वर्ण आल्यास संयुक्त वर्णातील प्रथम वर्णाचे द्वित्व पाणिनीय व्याकरणाच्या 'अनचि च' सूत्राद्वारे तसेच 'पाणिनीयशिक्षा' यांतील 'स्वरात् संयोगादिर्द्विरुच्यते सर्वत्र' या सूत्राद्वारे होते. हा उत्सर्ग नियम असून अपवाद सोडल्यांस सर्व ठिकाणी प्रयुक्त होतो. *- पाणिनीयशिक्षा*

**या नियमाचे काही अपवाद नियम अशा प्रकारे आहेत -**

### 1. परं तु रेफहकाराभ्याम्। *- पाणिनीय शिक्षा*

संयुक्त वर्णांतील प्रथम वर्ण रफार (रेफ) अथवा हकार असल्यांस द्वित्व होत नाही.

उदा. – पर्युपासते, गुह्यतमम्

### 2. (न) सवर्णे।

संयुक्त वर्णांत दोन्ही वर्ण समान असल्यांस स्वाभाविकत: द्वित्व होते आणि म्हणून तेथे अतिरिक्त द्वित्व करण्याची आवश्यकता नाही. *- प्रातिशाख्य*

उदा. – उत्सन्न, मय्यावेश्य

### 3. संयुक्त वर्णांत तीन व्यञ्जनांचा संयोग असल्यांस द्वित्व होत नाही *- पाणिनीय शिक्षा*

उदा. – कृत्स्नम्, भक्त्या

### 4. प्रथमैर्द्वितीयास्तृतीयैश्चतुर्थाः। *- पाणिनीय शिक्षा*

संयुक्त वर्णांत असलेल्या पांचहि वर्गामधील सर्व वर्णांचे (स्पर्श वर्ण) द्वित्व करतांना द्वितीय वर्णाच्या पहिले प्रथम वर्णाचा आणि चतुर्थ वर्णाच्या पहिले तृतीय वर्णाचा प्रयोग केल्या जातो.

उदा. – जिघ्रन् = जि(ग्)घ्रन्

## शब्दावली

- **आदेश –** जेव्हा एखाद्या वर्णांस काढून टाकून (हटवून), दुसरा वर्ण शत्रुवत् त्याच्या जागी येतो तेव्हा त्याला '**आदेश**' असे म्हणतात. उदा. – 'यदि+अपि = यद्यपि' येथे 'इ' च्या जागी 'य्' चा **आदेश** झाला आहे (शत्रुवदादेश:).
- **आगम –** जेव्हा एखाद्या वर्णासोबत दूसरा वर्ण मित्रवत् जवळ येउन त्याच्याशी संयुक्त होतो तेव्हा त्याला **'आगम'** असे म्हणतात. उदा. – 'कृष्ण+छेत्तुम्'=कृष्णच्छेत्तुम्' येथे कृष्ण मधील **ण** आणि छेत्तुम् मधील **छ** च्या मध्ये **च्** या वर्णाचा **'आगम'** झाला आहे (मित्रवदागम:).
- **लोप –** दोन वर्णांच्या सन्धित कोण्या एका वर्णा ला काढून टाकण्याच्या (हटवण्याच्या) प्रक्रियेला '**लोप**' असे म्हणतात (अदर्शनं लोप:).
- **प्रकृतिभाव –** जेव्हा दोन वर्णांच्या सन्धित आदेश, आगम अथवा लोप यापैकी काहीही होत नसून पदांची स्थिति पूर्ववतच असते तेव्हा त्यांस '**प्रकृतिभाव**' असे म्हणतात.
- **प्रत्यय –** ज्या वर्णांचे अथवा वर्ण समुदायां चे स्वतंत्र अस्तित्व नसून ते काही विशिष्ट शब्दांच्या पुढे युक्त होऊन त्यांचा अर्थ परिवर्तन करतात त्यांस '**प्रत्यय**' असे म्हणतात. प्रत्यय पांच प्रकार चे असतात – सुप्, तिङ्, कृत्, तद्धित, स्त्री प्रत्यय.

- **उपसर्ग –** असे शब्द जे धातु च्या पूर्वी युक्त होऊन त्याच्या अर्थाचे परिवर्तन करतात अथवा त्याच्या अर्था ची पुष्टि करतात त्यांना '**उपसर्ग**' असे म्हणतात. उदा. – हार शब्दाचा अर्थ पराजय असून त्या सोबत विभिन्न उपसर्ग युक्त झाल्यावर अनेक वेगवेगळ्या अर्थां चे शब्द तयार होतात –
  1. प्र + हार = प्रहार (आघात), 2. सम् + हार = संहार (विनाश), 3. वि + हार = विहार (विचरण)
  संस्कृत भाषेंत एकूण 22 उपसर्ग आहेत - प्र, परा, अप, सम्, अनु, अव, निस्, निर्, दुस्, दुर्, वि, आङ्, नि, अधि, अपि, अति, सु, उत्, अभि, प्रति, परि, उप.

- **कठोर-मृदु व्यंजन व अनुनासिक –**

| कठोर व्यंजन | | मृदु व्यंजन | | अनुनासिक |
|---|---|---|---|---|
| क् | ख् | ग् | घ् | ङ् |
| च् | छ् | ज् | झ् | ञ् |
| ट् | ठ् | ड् | ढ् | ण् |
| त् | थ् | द् | ध् | न् |
| प् | फ् | ब् | भ् | म् |
| श्, ष्, स् | | य्, र्, ल्, व्, ह् | | 'यँ', 'लँ', 'वँ' |

# सामान्य संस्कृत

संस्कृत भाषेंत कारक आणि क्रिया यांचा परिचय असल्यांस सामान्य वाक्यांची रचना केल्या जाऊ शकते. संस्कृत वाक्य बनविण्यासाठी सर्वप्रथम क्रिया (कुठलेही कार्य) बघितल्या जाते. यालाच धातुरूपाच्या माध्यमातून व्यक्त केल्या जाते. धातुरूपांचा प्रयोग, क्रिया करणाऱ्या व्यक्तिंची संख्या आणि पुरुष (प्रथम, मध्यम, उत्तम) या अनुसार होतो.

संस्कृत भाषेत 6 कारक आहेत. **कर्ता** (क्रिया करणारा) कोण आहे, तत्पश्चात् **कर्म** (कर्त्याला क्रियेसाठी काय इष्ट आहे), **करण** (ज्यामुळे केल्या जात आहे), **सम्प्रदान** (ज्याला काही दिल्या जात आहे), **अपादान** (विभाग होण्याच्या क्रियेत जो स्थिर आहे), **अधिकरण** (क्रिया ज्या स्थानावर होत आहे). प्रत्येक शब्दाची त्याच्या कारकानुसार विभक्ति केल्या जाते. वाक्यरचना करण्याच्या उद्देशाने काही आधारभूत नियम येथे देत आहे -

संस्कृत भाषेत लिंगाच्या आधारावर शब्दांचे विभाजन होते – शब्दांचे रूप, त्यांचे लिंग आणि अंतिम वर्णा च्या आधारा वर परिवर्तित होत असतात. राम, श्याम, अनुराग इत्यादि शब्दांचे रूप एकसमान आहेत. मति, गति, रति यांचे एक समान तसेच जगत्, मनस् इत्यादि शब्दांचे एकसमान आहेत. पुल्लिंगी राम शब्द आणि काही सामान्य धातु आपण उदाहरण म्हणून बघूया.

## 'अकारान्त पुल्लिँङ्ग राम शब्द'

| विभक्ति | कारक | एकवचन | द्विवचन | बहुवचन |
|---|---|---|---|---|
| **प्रथमा** | कर्ता | रामः | रामौ | रामाः |
| **द्वितीया** | कर्म | रामम् | रामौ | रामान् |
| **तृतीया** | करण | रामेण | रामाभ्याम् | रामैः |
| **चतुर्थी** | सम्प्रदान | रामाय | रामाभ्याम् | रामेभ्यः |
| **पंचमी** | अपादान | रामात् | रामाभ्याम् | रामेभ्यः |
| **षष्ठी** | सम्बन्ध | रामस्य | रामयोः | रामाणाम् |
| **सप्तमी** | अधिकरण | रामे | रामयोः | रामेषु |
| **सम्बोधन** | सम्बोधन | हे राम! | हे रामौ! | हे रामाः! |

काही प्रसिद्ध धातु :

1. गच्छति – जात आहे.
2. क्रीडति – खेळत आहे.
3. खादति – खात आहे.
4. पठति – वाचत आहे.
5. वदति – बोलत आहे.
6. चलति – चालत आहे.

उदाहरण स्वरूपांत **'पठ्' धातु चे लट् लकार** (वर्तमान काळ क्रिया) रूप देत आहे -

| पुरुष | एकवचन | द्विवचन | बहुवचन |
|---|---|---|---|
| **प्रथम पुरुष** | पठति | पठतः | पठन्ति |
| **मध्यम पुरुष** | पठसि | पठथः | पठथ |
| **उत्तम पुरुष** | पठामि | पठावः | पठामः |

संस्कृतांत क्रियापदाचे रूप तीन पुरुषांनुसार (प्रथम पुरुष, मध्यम पुरुष, उत्तम पुरुष) बदलतात. कुठल्या अन्य व्यक्ति साठी प्रथम पुरुष, ज्याच्याशी संवाद करत आहे त्याच्यासाठी मध्यम पुरुष, स्वत:साठी उत्तम पुरुष असा प्रयोग होतो. या नियमांना लक्ष्यात येण्यासाठी काही वाक्य उदाहरण म्हणून खाली देत आहे :

**1.** रामः गच्छति। 1. रामः पश्यति। 1. रामः पठति। 1. रामः वदति।

**2.** त्वं गच्छसि। 2. त्वं पश्यसि। 2. त्वं पठसि। 2. त्वं वदसि।

**3.** अहं गच्छामि। 3. अहं पश्यामि। 3. अहं पठामि। 3. अहं वदामि।

**सर्व विभक्त्यांचे काही उदाहरणं :**

1. रामः गच्छति (राम जात आहे) - रामः (प्रथमा - कर्ता)
2. रामः ग्रामं गच्छति (राम गांवाला जात आहे) - ग्रामं (द्वितीया - कर्म)
3. रामः कलमेन लिखति (राम लेखणीने लिहीत आहे) - कलमेन (तृतीया - करण)
4. रामः कृष्णाय फलं ददाति (राम कृष्णाला फळ देत आहे) - कृष्णाय (चतुर्थी - सम्प्रदान)
5. रामः ग्रामात् आगच्छति (राम गांवाहून येत आहे) - ग्रामात् (पञ्चमी - अपादान)
6. रामस्य पुत्रः कुशः (रामाचा पुत्र कुश) - रामस्य (षष्ठी - सम्बन्ध)
7. रामः विद्यालये पठति (राम विद्यालयांत शिकतो) - विद्यालये (सप्तमी - अधिकरण)

|| इति ||

*गीता परिवाराच्या साहित्याचा उपयोग अन्य ठिकाणी करण्यासाठी पूर्वानुमति आवश्यक आहे.*
*अनुमति साठी* **consent@learngeeta.com** *वर आम्हाला लिहा.*